**<u>महत्वाचे तातडीचे</u>**

क्र/दिकआ/प्र-७/व्होकेशनल बोर्ड
मान्यता/२०१९-२०/ १५७
**दिव्यांग कल्याण आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
दि. २०.०१.२०२०

**प्रति,**
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, मुंबई शहर / उपनगर.

**विषय : आपल्या जिल्हा अधिनस्त कार्यरत दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांच्या विशेष कर्मशाळांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ मुंबई यांची मान्यता घेणेबाबत...**

**संदर्भ** : दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम १९.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ ची अंमलबजावणी देशातील सर्व राज्यांमध्ये सुरु झालेली आहे. सदर कायद्यातील कलम १९ नुसार सर्व प्रकारच्या शिक्षण योजना व कार्यक्रमामध्ये दिव्यांग व्यक्तींचा समावेश करावयाचा आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाकडे आपले विशेष कर्मशाळांची नोंदणी करुन घेणे व नुतनिकरण करुन घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार आपल्या जिल्हयाच्या अधिनस्त सर्व विशेष कर्मशाळांची नोंदणी महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाकडे माहे फेब्रुवारी २०२० पुर्वी नोंदणी / नुतनिकरण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिव्यांग कल्याण आयुक्तालयास तात्काळ सादर करावा.

**(प्रेरणा देशभ्रतार** भा.प्र.से.**)**
**आयुक्त, दिव्यांग कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत :-माहितीस्तव सविनय सादर**
सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ मुंबई.